**स.फौ.के. नं. २१४/२०२४**

**नि. क्र. २२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – नितीन बाळकृष्ण जाधव,

**वय** – ४४ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस हेड कॉ./१०२७),

**सध्या नेमणूक** – देवरुख पोलीस ठाणे अंतर्गत साखरपा पोलीस दुरक्षेत्र, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u> –**

**०१.** दिनांक २१/०७/२०२४ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख अंतर्गत असलेल्या साखरपा पोलीस दूरक्षेत्र येथे कार्यरत होतो. त्यादिवशी आम्हाला गोपनीय माहिती मिळाली की, मौजे ओझरे बुद्रुक येथे विष्णू रामचंद्र कांबळे हा गावठी दारुचा अवैध व्यवसाय चालवितो.

**०२.** त्यावरुन प्रभारी अधिकारी यांना कळवुन त्यांच्या मादर्गदशनाखाली मी, चालक–पो.शि./९४ श्री. नटे व पोलीस हवालदार श्री. करांडे असे आम्ही हालचाल नोंदवहीला नोंद करुन छापा टाकणेकामी आवश्यक ती साहित्य घेवुन सरकारी वाहनाने निघालो.

**०३.** आम्ही ओझरे बुद्रुक येथील बौध्दवाडी रस्त्याला एका बाजूला आमचे वाहन उभे केले. तेथे दोन इसमांना पंच म्हणून बोलावले. त्यांना छाप्याबाबत माहिती दिली. त्यानंतर पंच व आम्ही पोलीस असे आम्ही बौध्दवाडी ओझरे बुद्रुक येथे विष्णू रामचंद्र कांबळे यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याने लक्ष ठेवून पायी निघालो. त्यावेळी, विष्णु कांबळे यांच्या घराशेजारी एक इसम त्याच्या पुढयात प्लॅस्टीकच्या ०२ बाटल्या व ०१ ग्लास घेवून बसलेला आम्हाला दिसला. आम्हाला त्याचा संशय आला. आम्ही त्याला जागीच रात्री ०८:०० वाजता धरले. आम्ही त्याच्याकडील बाबींची पाहणी केली असता त्याच्या ताब्यात प्रत्येकी ०२ लिटर मापाच्या ०२ बाटल्या व ०१ काचेचा पेला मिळून आला. आम्ही त्या बाटल्यांची खात्री केली असता त्या गावठी दारुने भरलेल्या होत्या.

०४.  आम्ही पंचांसमक्ष त्या इसमाला त्याचे नाव–गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विष्णु रामचंद्र कांबळे, राहणार – ओझरे बुद्रुक, बौध्दवाडी, असे सांगितले.

०५.  त्याठिकाणी मी पंचांसमक्ष १८० मिली क्षमतेच्या एका बाटलीत मिळून आलेल्या मुद्देमाल दारुपैकी काही दारु रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतली. त्या नमूना बाटलीला व प्रत्येकी ०२ लिटरच्या त्या दोन्ही बाटल्यांना पंचांच्या व पोलीसांच्या सहयांचे लेबल चिकटविले. त्याठिकाणी मिळून आलेला मुद्देमाल ताब्यात घेतला. तेथे त्याबाबत पंचनामा पंचांसमक्ष २०:०० ते २०:५५ च्या दरम्यान करण्यात आला. *(साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी व दोन पंचांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर* ***पंचनाम्याला निशाणी क्रमांक २३*** *देण्यात येते).*

०६.  त्यावेळी चालक श्री नटे यांनी त्यांच्या खाजगी मोबाईलवर छायाचित्रे घेतली. *(साक्षीदारास प्रकरणातील वस्तु – अ कडील छायाचित्रे दाखविण्यात आली). त्यामध्ये मी, आरोपी, दोन पंच, फिर्यादी व साक्षीदार असे दिसत आहेत.*

०७.  त्यानंतर आम्ही मिळून आलेल्या मुद्देमालासह पोलीस दूरक्षेत्र साखरपा येथे परत आलो. तेथे आल्यावर पो.ह.श्री. करांडे यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली.

०८.  आरोपी व मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखू शकते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. *(मुद्देमाल न्यायालयात जमा नाही).*

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेकडून –**

०९.  हे म्हणणे खरे आहे की, छाप्याकामी जाताना स्टेशन डायारीला नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पंचांना कसे बोलाविण्यात आले, याचा उल्लेख पंचनाम्यात करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घराचा क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ओझरे, बौध्दवाडी येथे अनेक राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, व्हॅस्कीच्या बाटलीवर तिच्या कंपनीचे नाव नमुद असते. हे म्हणणे खरे

नाही की, आरोपी मुद्देमालासह मिळुन आल्याचे मी खोटे कथन करीत आहे.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, नमुना मुद्देमाल घेण्याआधी ती बाटली निर्जंतुकीकरण करुन घेतली होती, असा उल्लेख पंचनाम्यात करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यापुर्वी मी व पंचांनी अंगझडती दिल्याचे पंचनाम्यात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.11 14:46:00 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक –१०.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 10/03/2026 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 10/03/2026 |
| Evidence uploaded on | : | 10/03/2026 |